MHKO010007322025

**<u>सत्र खटला क्र.४३/२०२४ मधील नि.क्र.२३</u>**
**<u>खालील आदेश.</u>**

महाराष्ट्र सरकार तर्फे राजारामपुरी पोलीस ठाणे.
वि.
संतोष सुरेश माळी व इतर

प्रस्तुत अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. अर्जदार रेश्मा संजय माळी यांचे कथन की, त्यांचे मयत पतीचे मालकीची हिरो होंडा या कंपनीची स्प्लेंडर दुचाकी नोंदणी क्र.एम.एच.०९-इ.टी.-८५२२ राजारामपुरी पोलीस ठाणे यांनी गु.र.नं.७०२/२०२४ मध्ये जप्त केली आहे. अर्जदार यांचे पती दिनांक ०९/०७/२०२४ रोजी मयत झाले आहेत. जप्त दुचाकी ही अर्जदार यांचे मयत पतीचे मालकीची असून ती पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास त्याचे नैसर्गिक आपत्तीपासून नुकसान होणार आहे. सदर मुद्देमाल हा अर्जदारच्या ताब्यात दिल्यास न्यायालय जेव्हा आदेश करतील त्यावेळी न्यायालयात हजर करणेस तयार आहेत. त्याचप्रमाणे त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल, फेरफार करणार नाहीत किंवा त्याची विक्री अगर तबदील करणार नाहीत. तरी प्रस्तुतचा अर्ज.

३. तपासी अंमलदार यांनी (नि.२४) म्हणणे देवून असे कथन केले की, मयत हा अर्जदाराचा पती असून तो मयत झालेने त्याचे पत्नीस जप्त दुचाकी योग्य त्या अटी व शर्तीवर परत करणेस त्यांची कोणतीही हरकत नाही.

४.          अभियोगपक्षाने (नि.२५) म्हणणे देवून असे कथन केले की, प्रस्तुतचा गुन्हा गंभीर स्वरूपाचा असून सदर दुचाकी अर्जदार यांना परत दिलेस त्या दुचाकीचा दुस-या गुन्ह्यात वापर होणेची शक्यता नाकारता येत नाही. अभियोगपक्षाने जप्त मुद्देमाल अर्जदारचे ताब्यात देण्यात येवू नये असे कथन केले.

५.          कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार रेश्मा संजय माळी यांनी जप्त मुद्देमाल म्हणजे दुचाकीची आरटीओ कार्यालयाकडील दुचाकीची नोंदणी पावती, दुचाकीचे पॉलीसीची प्रत, गाडी मालकाचे मृत्यू प्रमाणपत्र, अर्जदाराचे आधारकार्डची प्रत तसेच जप्त दुचाकीचे मूळ स्मार्ट कार्ड गहाळ झालेबाबत पोलीस ठाणेकडील प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर दुचाकी ही अर्जदार यांचे पती संजय सुरेश माळी यांचे नावे नोंदणीकृत असल्याचे दिसून येते. मृत्यू प्रमाणपत्रावरुन गाडीचे मालक संजय सुरेश माळी हे दिनांक ०९/०७/२०२४ रोजी मयत झालेचे दिसून येते. अर्जदार यांनी पोलीस स्टेशनचे प्रमाणपत्र दाखल करून मूळ स्मार्ट कार्ड गहाळ झाल्याचे कथन केले.

६.          सदर प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराचे पती संजय सुरेश माळी हे प्रस्तुत गुन्ह्यातील आरोपी नाहीत. तसेच तपासी अंमदार यांनी प्रस्तुत वाहन अर्जदार यांना देण्यास हरकत नाही असे कथन केले. प्रस्तुत कागदपत्रांवरून अर्जदाराचे पती मयत असून ते जप्त वाहनचे नोंदणीकृत मालक असल्याचे दिसून येते.

७.		ना.सर्वोच्च न्यायालयाने **<u>सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात सरकार, ए.आय.आर. २००३ एस.सी. ६३८</u>** या न्यायनिवाड्यामध्ये जप्त मुद्देमालाची गरज नसताना पोलीस ठाण्यात पडून ठेवू देवू नये व योग्य त्या अटी व शर्तींवर मालक किंवा संबंधितांना ते परत करावे, असे निर्देश दिलेले आहेत. सबब, जप्त मुद्देमाल अर्जदारच्या अंतरिम कब्जात देणे योग्य व संयुक्तिक होणार आहे. म्हणून मी याकामी पुढीलप्रमाणे आदेश पारित करते.

## <u>आदेश</u>

१) अर्ज मंजूर केला.

२) गु.र.नं.७०२/२०२४ चे तपासी अंमलदार, राजारामपुरी पोलीस ठाणे यांनी जप्त केलेला मुद्देमाल म्हणजे हिरो होंडा या कंपनीची स्प्लेंडर दुचाकी नोंदणी क्र.एम.एच.०९-इ.टी.-८५२२ अर्जदार रेश्मा संजय माळी यांना अंतरिम कब्जात रक्कम रुपये ४५,०००/- (पंचेचाळीस हजार मात्र) च्या सुपुर्तनाम्यावर खालील अटींवर द्यावी :-

अ) अर्जदारने सदर जप्त मुद्देमाल हे कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करु नये किंवा नष्ट करु नये किंवा त्याचे स्वरुप बदलू नये.

ब) अर्जदारने सुपूर्तनामा तपासी अंमलदारच्या समक्ष द्यावा.

क) या न्यायालयाने किंवा अन्य न्यायालयाने आदेश केल्यास जप्त मुद्देमाल न्यायालयात हजर करावे.

ड) तपासी अंमलदारने जप्त मुद्देमाल अर्जदारचे ताब्यात देताना सविस्तर पंचनामा करुन त्याची सर्व बाजूंनी छायाचित्रे घ्यावीत आणि छायाचित्रे व सुपूर्तनामा दोषारोपपत्रासोबत दाखल करावे.

ई) सदर आदेशाची एक प्रत संबंधित तपासी अंमलदारास देण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Order
Digitally signed by
SAMEERA YASIN
SHAIKH
Date: 2026.04.04
17:49:33 +0530

कोल्हापूर. **(श्रीमती एस. वाय देशमुख)**

दिनांक:०४.०४.२०२६. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, कोल्हापूर.